# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- आयकर विधेयक लोकसभेत सादर–अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची सांगता
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची १८ हजार ८८२ पदे भरण्यात येणार
- कारंजा शहरातल्या एका रुग्णालयात गर्भलिंग निदान केलं जात असल्याचं उघड
- निवडणूक उमेदवारी अर्जात खरी माहिती दडवल्याप्रकरणी धनंजय मुंडे यांना कारणे दाखवा नोटीस

आणि

- राज्य शासनाने विधवा शब्दाऐवजी 'पूर्णांगिनी' शब्द वापरण्याची राज्य महिला आयोगाची शिफारस

****

आयकर विधेयक आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केलं. विरोधकांनी या अहवालाला विरोध दर्शवत जोरदार घोषणाबाजी करत सभात्याग केला. विरोधकांनी मांडलेल्या आक्षेप आणि हरकतीच्या मुद्यांना या विधेयकावर चर्चेदरम्यान सविस्तर उत्तर दिलं जाईल, असं सीतारामन यांनी सांगितलं. जुन्या विधेयकातल्या ८१९ कलमांच्या ऐवजी प्रस्तावित विधेयकात ५३६ कलमं असून, कायद्याची भाषा अधिक सुलभ केल्याची माहिती सीतारामन यांनी दिली. या विधेयकावर विचारासाठी एक समिती गठीत करण्यात येणार असून, याबाबतचे सर्वाधिकार सदनाने अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले आहेत. ही समिती अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या पहिल्या दिवशी आपला अहवाल

सदनासमोर सादर करेल, असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. दरम्यान, वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात स्थापन संयुक्त समितीचा अहवाल जगदंबिका पाल यांनी सदनासमोर ठेवला. त्यानंतर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदनाचं कामकाज १० मार्चपर्यंत स्थगित केलं. लोकसभेत या सत्रात ११२ टक्के कामकाज झाल्याचं बिर्ला यांनी सांगितलं.

राज्यसभेतही अर्थसंकल्पावर चर्चा झाली, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या चर्चेला उत्तर दिलं. त्यानंतर उपसभापतींनी राज्यसभेचं कामकाज येत्या १० मार्चपर्यंत स्थगित केलं.

****

परीक्षा पे चर्चामध्ये उद्याच्या भागात संतुलित पोषण आणि निरोगी जीवनशैली या विषयावर फूड फार्मरच्या पोषणतज्ज्ञ आणि आरोग्य तज्ज्ञ ऋजुता दिवेकर, रेवंत हिमत्सिंगका आणि शोनाली सभरवाल विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत, दैनंदिन जीवनात सुदृढ आरोग्यासाठी पोषक आहाराबाबत ते विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

****

प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यादरम्यान अफवा आणि चुकीच्या माहितीपासून भाविकांना वाचवण्यासाठी उत्तरप्रदेश पोलिस कठोर कारवाई करत असल्याची माहिती, पोलीस महासंचालक प्रशांत कुमार यांनी दिली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सूचनेनुसार, महाकुंभमेळ्याबद्दल खोट्या बातम्या पसरवणाऱ्या सामाजिक माध्यमांवरील अशा अकाउंट्सची ओळख पटवून कारवाई केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, प्रयागराजला महाकुंभमेळ्यात जाण्यासाठी हुबळी ते वाराणसी दरम्यान रेल्वे गाडीच्या सहा फेऱ्या होणार आहेत, ही गाडी मिरज, सांगली, सातारा, पुणे, दौंड, अहिल्यानगर अशी धावणार आहे. ही गाडी हुबळीहून १४, २१ आणि २८ फेब्रुवारीला सकाळी आठ वाजता निघणार आहे.

****

महिला आणि बालविकास विभाग एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ५ हजार ६३९ अंगणवाडी सेविका आणि १३ हजार २४३ मदतनीस अशी एकूण १८ हजार ८८२ पदे भरणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. मंत्रालयात महिला सहकारी संस्था, महिला बचत गट, महिला मंडळ आणि अंगणवाडीबाबतच्या विविध प्रश्नांबाबत तसचं भिवंडी शहरात

अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढवण्याबाबत काल बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं त्यावेळी त्या बोलत होत्या. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं होणार असून उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरातील एका रुग्णालयात गर्भलिंग निदान केलं जात असल्याचं उघडकीस आलं आहे. आरोग्य विभागाच्या पथकाने या रुग्णालयावर काल रात्री छापा टाकला. या छाप्यात रुग्णालयात ५ गर्भवती महिला गर्भलिंग निदानाच्या प्रतीक्षेत असल्याचं आढळून आलं. यापैकी २ महिला बुलडाणा जिल्ह्यातल्या, २ अकोला जिल्ह्यातल्या आणि एक महिला वाशिम जिल्ह्यातल्या रिसोड इथली असल्याचं समोर आलं. छाप्यादरम्यान, पथकाने सोनोग्राफी मशीन सील केली आणि सोनोग्राफी एजंटकडून ७० हजार ५०० रुपये तसेच मोबाईल जप्त केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

गर्भलिंग निदान चाचणी प्रतिबंधात्मक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य सेविका आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. आबिटकर यांनी राज्यातील आरोग्य अधिकाऱ्यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. गर्भलिंग निदान केंद्रांवर जरब बसण्याकरिता या कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

वाळू तस्करी रोखण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून वाळू माफियांवर मोक्का लावणे, हद्दपार करणे यासारख्या कारवाई करण्यात येणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते आज अकोल्यात माध्यमांशी बोलत होते. रेती मिळत नसल्याने वाळू माफिया तयार होतात त्यामुळे आता मुबलक प्रमाणात रेती मिळेल आणि लवकरच नवं चांगलं वाळू धोरण जाहीर करू, यामध्ये कडक कायदे असतील असं ते म्हणाले.

****

धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा, मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी महामंडळ हे लाखो रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी एक आदर्श संस्था म्हणून कार्य करेल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे.

महामंडळाच्या पहिल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यभरातील सर्व रिक्षा तसंच टॅक्सी चालकांना नाममात्र वार्षिक वर्गणी भरून या मंडळाचं सदस्यत्व घेता येणार आहे. ६५ वर्षावरील ऑटो रिक्षा तसंच टॅक्सी चालकांना महामंडळाकडून प्रत्येकी १० हजार रुपये सन्मान निधीही दिला जाणार आहे.

****

ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. हिंदुस्थानी संगीतातील स्वर भास्कर दिगंतात विसावला, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. कारेकर यांचं काल मुंबईत वृद्धापकाळाने निधन झालं, ते ८० वर्षांचे होते. दादर इथं आज संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

****

विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरताना खरी माहिती दडवल्याप्रकरणी परळीच्या फौजदारी न्यायालयाने मंत्री धनंजय मुंडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. करुणा मुंडे यांनी दाखल केलेल्या ऑनलाइन तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त आदेश देण्यात आला आहे. यावर येत्या २४ फेब्रुवारीला परळीच्या फौजदारी न्यायालयात सुनावणी होणार असल्याचं तक्रारदाराचे वकील चंद्रकांत ठोंबरे यांनी सांगितलं.

****

राज्य शासनाने विधवा हा शब्द हटवून त्या ऐवजी 'पूर्णांगिनी' हा शब्द वापरावा अशी शिफारस राज्य महिला आयोगाने केली आहे. आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं ही माहिती दिली. महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील झालेल्या महिला अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. आपल्या पदावर काम करतांना सोबतच्या महिलांना जागरुक करण्याचं आवाहन करत, समाजाची मानसिकता बदलण्याची आवश्यकता चाकणकर यांनी व्यक्त केलं.

****

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर इथले संगीत रसिक संजय पवार यांनी जगभरातल्या रेडिओंसोबतच अनेक ग्रामोफोन आणि संगीताच्या दोन हजारांहून अधिक तबकड्यांचा संग्रह केला आहे. आपल्या या संग्रहाचं पवार यांनी आज सर्वसामान्यांसाठी प्रदर्शन भरवलं. शहरातल्या अनेक

रेडिओप्रेमींनी या प्रदर्शनाला भेट दिली. प्राध्यापक वीरा राठोड यांनी या प्रदर्शनाबाबत आपलं मनोगत व्यक्त केलं, ते म्हणाले –

***कुठलीच गोष्ट जुनी होत नसते. ती परत नव्याने समोर येत असते. पण नव्या पिढीने हे सगळं बघितलं पाहिजे. कदाचित यातूनच अजून नव्या गोष्टी आपल्याला पुढे आणता येतील. या प्रदर्शनात मी हे जे सगळं पाहिलं, तर मला सुद्धा बऱ्याच गोष्टी मी कुठे वाचल्या होत्या किंवा ऐकल्या होत्या त्या प्रत्यक्षात इथे पाहायला मिळाल्या. आणि नवीन एक ज्ञान यातून मिळालं. आणि ते खूप इंटरेस्टींग होतं.***

****

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या जुळे सोलापूर शाखेचे विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ अभिनेते डॉ.मोहन आगाशे यांना डॉ.वासुदेव रायते स्मृती पुरस्कार तर श्यामची आई चित्रपटातील श्यामची भूमिका साकारणारे माधव वझे यांना श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या रविवारी १६ फेब्रुवारीला सोलापूर इथं या पुरस्कारांचं समारंभपूर्वक वितरण होईल अशी माहिती साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी दिली.

****

बीड जिल्ह्यात शिरूर कासार तालुक्यात मंत्री पंकजा मुंडे आणि पालकमंत्री अजित पवार गटाच्या समर्थकांची विकास कामे रोखण्यात आल्याचा आरोप दोन्ही पक्षाच्या समर्थकांनी केला आहे. पंचायत समिती अंतर्गत येत असलेली सर्वच कामे सुरळीत सुरू व्हावे या मागणीसाठी कार्यकर्त्यांनी पंचायत समिती कार्यालयाच्या बाहेर आंदोलन करत गटविकास अधिकाऱ्यांना घेराव घातला.

****

आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत गरजूंना, पाच लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी कार्ड काढण्याकरता तसंच नावाची नोंदणी करण्याकरता हिंगोली नगर परिषदेच्या वतीने विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. हिंगोली शहरात पाच ठिकाणी शिबीरं आयोजित करण्यात आले असल्याची माहिती, नगरपरिषद मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी दिली आहे.

****